Monday, November 25, 2024
8:06 PM

# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २५/११/२०२४

घरफोडी

| अ. क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | मिळाला माल/<br>चोरीस गेला | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर<br><br>अप क्र ४५४/२०२४कलम ३०५(ड), ३३१(४)BNS | सरोज चौक संकट मोचन हनुमान मंदीर अमरावती | दि २५/११/२०२४ चे सकाळी ०३.३० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ - दि २५/११/२०२४ चे १४.५२ वा | अमित शंकर पटेल वय ४६ वर्ष व्यवसायय व्यापार रा पटेल नगर साई नगर अमरावती | २ अनोळखी इसम | दान पेटी मधुन अंदाजे नगदी १५०००/- रु | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांना दि २५/११/२०२४ चे सकाळी ०६.०० वा संकट मोचन हनुमान मंदीर याचे अध्यक्ष यांनी कॉल केला की मंदीराचे कुलुप तुटलेले दिसत आहे तेव्हा फि हे तेथे गेले असता मंदीराचे कुलुप तुटलेले दिसले पुजा-यासोबत मंदीराच्या आत गेले असता दात पेटी वाकलेली दिसली व तेथील सामान सुध्दा अस्तव्यस्त दिसले सिसिटीटव्हीच्या वेळे नुसान यातील घ ता वेळी व ठिकाणी दोन अज्ञात इसमांने सरोज चौक अमरावती येथील संकट मोचन हनुमान मंदीर मध्ये समोरील लोंखंडी ग्रीलगेट चे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन दान पेटी फोडुन पेटी मधिल अंदाजे नगदी १५,०००/- रु चोरुन नेले आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने गुन्हा दाखल |

इतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टे बडनेरा अप.क्र.७३३/२०२४ कलम १२२ मपोका | शिवाजी चौक नवी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि.२५.११.२०२४ चे ००.१५ वा.<br>दाखल ता.वेळ - दि.२५.११.२०२४ चे ०३.४६ वा. | सरतर्फे ASI प्रमोद गुडधे ब.नं.२७७ पोस्टे बडनेरा | आवेज खान युसुफ खान वय-३० वर्ष रा. अस्ताना मोहल्ला कारंजा जि.वाशिम | | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी शिवाजी चौक नवी वस्ती बडनेरा येथे ००.१५ वा. दरम्यान एक इसम हा संशयीत रित्या चोरीसारखा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने स्वत:चे अस्तित्व लपवुन भटकत असतांना मिळुन आला. त्यास एवढया रात्री सदर परिसरामध्ये फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. सदर इसम हा सुर्योस्त ते सुर्योदया दरम्यान भटकत असतांना मिळुन आल्याने त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्याचे कृत्य कलम १२२ महा.पो.का.प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ<br><br>दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका- यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा मर्ग क्र.६९/२०२४ कलम १९४ **BNNS** | कवठा बहाळे शेतशिवारातील श्री अरुण काटोले यांचे शेतातील विहीर | | कु. नितु चंदु गजभिये वय- २२ वर्ष रा. ग्राम कवठा बहाळे ता.भातकुली | राहुल भाऊराव गजभिये वय- ३५ वर्ष रा. ग्राम कवठा बहाळे ता.भातकुली जि.अमरावती | पाण्यात बुडुन मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फि.यांची मृतक चुलत बहिण ही घरुन इंधन आणण्याकरिता विळा घेवुन दि.२३.११.२०२४ चे १३.०० वा. गेली होती.परंतु ती बरेच वेळ परत न आल्याने पोस्टे बडनेरा येथे मिसींग दाखल करण्यात आला. परत तिचा शोध घेत असतांना २१.०० वा. दरम्यान गावातील नमुद ठिकाणी विहीरीत बुडुन मरण पावलेली आढळुन आली.वरुन लोकांचे मदतीने सदरचे प्रेत काढण्यात आले. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. | पोहेका दिपक सराटे ब.नं.०४ पोस्टे बडनेरा अमरावती शहर |